तक्रारकर्ता यांचा शपथेवर पुढील उलटतपास गैरअर्जदारातर्फे श्री गावंडे वकीलसाहेब.

१७. मला दि. ०६/०२/२०१९ चे पत्र दाखविले. त्यामध्ये समिती नियुक्त करण्यात आली होती. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०६/०२/२०१९ च्या पत्रान्वये समिती स्थापन केल्याचे खोटे सांगत आहे. दि. २९/१०/२०२० ची नोटशीट दाखविली, त्यावर माझी सही आहे. त्यानुसार समिती गठीत झाली. ही समिती दि. ०६/०२/२०१९ च्या पत्रानुसार नव्हती. दि. १९/०९/२०२० रोजी मी नस्ती प्रस्तावीत केली. त्यावर माझी सही आहे. माझी नियुक्ति अकोट मख्यालयात झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी अकोला येथे राहून रोज ये—जा करत होतो. हे म्हणणे खरे नाही की, दरम्यानच्या काळात माझेविरूध्द न्यायालयात केसेस सुरू होत्या. मी माझे भावाविरूध्द न्यायालयात तक्रार दाखल केली होती. केस सन २०२१ साली दाखल केली होती. त्यावेळेस मी कामावर होतो. त्याची माहिती मी कार्यालयात दिली नाही. त्या प्रकरणासाठी मी सट्टया घेतल्या होत्या. मी माझा हक्क सोडण्यासाठी करार केला व त्यानुसार माझे भावाने मला धनादेश दिला होता व त्याबाबतची तक्रार दाखल केली होती. त्याचा निकाल मला दाखविला. त्यास **नि. यु—३३** देण्यात येते. माझे वडील नोकरीस नव्हते. माझे वडील सन २००६ साली वारले. माझे तक्रारीत परिच्छेद १५ मध्ये आई—वडीलांच्या जबाबदारीबाबत नमुद केले आहे. सासु—सासरे म्हणजे माझे आई—वडील आहेत. त्याची माहिती मी वकीलांना दिली होती. मला कामावरून कमी केले त्या दिवशी मी करारानुसार कार्यालयात हजर होतो. माझा शेवटचा नियुक्तिचा आदेश दि. २९/०६/२०२२ चा आहे. त्यानंतर पुर्ननियुक्तिचा प्रस्ताव पाठविण्यात आला होता. त्याची प्रत याकामी दाखल नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पुर्ननियुक्तिचा प्रस्ताव पाठविल्याचे खोटे सांगत असून मी बेकायदेशीररित्या कामावर होतो. प्रस्ताव पाठविल्याच्या ६ महिन्यानंतर आदेश येत होते. एका भरती प्रक्रीयेच्या दोन तक्रारी प्राप्त झाल्याचे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि. २९ चा खोटा जबाब दिला होता. पहिल्या समितीसमोर मी कामगार या नात्याने जबाब दाखल केला होता. भरती प्रक्रीयेमध्ये मी फक्त साक्षीदार म्हणून काम केले आहे. माझेविरूध्द झालेल्या तक्रारीबद्दल मला माहिती नाही. चौकशीमध्ये मनिषा चिखले यांनी दिलेला जबाब मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, भरती प्रक्रीयेमधील कागदपत्रांची पडताळणी मी केली होती.

दि. १५/०६/२०२१ च्या पत्रान्वये मला भरती प्रक्रीयेत भाग घेण्यासाठी आदेश दिलेला नाही. दि. २२/०२/२०२१ ची नस्ती दाखविली, त्यावर मी सही करून २१/०२/२०२१ तारीख नमुद केली आहे. त्यास **यु—३३** देण्यात येते. मला दि. १५/०६/२०२१ चे पत्र दाखविले, त्यामध्ये मला कुठेही आदेशीत केले नाही. दुस—या भरती प्रक्रीयेमध्ये मी काही काम केलेले नाही. तसेच त्यामध्ये कुठेही सही नाही. दुस—या प्रक्रीयेमध्ये मला कोणताही आदेश दिलेला नाही. माझे वरिष्ठांनी माझेविरूध्द तक्रार दिल्याचे माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे सोबत काम करणा—या सर्व कर्मचा—यांना धमकावत होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी कामाच्या वेळेत दारू पिउन कार्यालयात झोपत होतो. हे म्हणणे खरे नाही की, भरती प्रक्रीयेत मी खोटे कागदपत्र तयार केले. नोटरी ॲड. जोशी यांनी बनावट कागद तयार केल्याबाबत तक्रार केल्याचे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, कामावरून कमी केल्यानंतर मी गैरअर्जदारास कोणतीही नोटीस दिलेली नाही. मी पाठविलेल्या ई—मेलच्या प्रती याकामी दाखल नाहीत. माझा मोबाईल हरविल्यामुळे मी ई—मेलच्या प्रती दाखल केल्या नाहीत. समितीतील सर्व सदस्य कार्यालयात उपलब्ध आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मला अनुभव असल्यामुळे मी भरती प्रक्रीयेत सामिल झालो. भरती प्रक्रीयेबाबत मी कोणतीही तक्रार दाखल केली नाही. भरती प्रक्रीयेत गैरकायदेशीर नियुक्ति चालु असल्याचे मला माहित नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी वरिष्ठांची गैरकायदेशीर कामे करत होतो म्हणून मला भरती प्रक्रीयेत घेण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की, मी भरती प्रक्रीयेत गैरव्यवहार केल्यामुळे गैरअर्जदाराचा माझेवरील विश्वास उडाला. हे म्हणणे खरे नाही की, माझेपेक्षा कनिष्ठ लोकांना कामावर ठेवल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे बडतर्फीबाबत गैरअर्जदाराशी कोणताही वाद नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला संधी दिली नसल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझेविरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी तक्रार दाखल करून खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.
फेरतपास नाही.

**समक्ष,**

**(एस. के. बांगड)**
**न्यायाधिश,**
**कामगार न्यायालय, अकोला.**

**दिनांक :— ०५/०२/२०२४.**